# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०९/०५/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा निमखेडा येथे दिनांक ०७/०५/२०२२ चे २२.५० वा. ते २३.४५ वा. दरम्यान अरोली पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन अरोली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–४०/बीजी–९५६० क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला व एम. एच.–४०/बीएल–६२२५ क्रमांकाच्या टाटा योद्धा गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी क्र. १. नितीन सुकल येळणे वय ३५ वर्ष रा. तारसा मौदा जिल्हा नागपूर, २. संकेत गुलाब येळणे वय १९ वर्षे रा. तारसा मौदा जिल्हा नागपूर, ३. शमीन इरशाद मोहम्मद सगीर वय २८ वर्षे रा. जुनी कामठी नागपूर व ४. मोबीन खान मतीन खान वय २० वर्ष राहणार जुनी कामठी नागपूर याच्या ताब्यातुन एकुण दोन्ही वाहनातील २४(बैल, गाय, गोरे) जनावरे कि. १,२२,०००/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. दोन्ही वाहनासह एकुण किंमती १०,२२,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक विशाल महालकर, पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ)(१)(२),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री राजेश जोशी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. वियजकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री राजेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश जोशी व त्यांचे पथकांनी यशस्वीरित्या पार पाडली.





## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील उमरेड ते भिवापुर रोड ठाणा शिवार येथे दिनांक ०७/०५/२०२२ चे २०.३० वा. सुमारास एम.एच– ४०/ बीएल– १५७५ क्रमांकाचा चालक आरोपीने आपला ट्रक विना इंन्डीकेटर तसेच कोणतीच निशानी न लावता रोडवर उभा केल्याने फिर्यादींचा भाउ नामे– मंजुर अहमद वल्द मोहम्मद अयुब शेख उमर, वय ५२ वर्ष रा. रमाई नगर, नारी रोड, नागपुर हा आपली एम.एच– ३१/डीवाय– ३७९० क्रमांकाच्या पॅशने प्रो मोटरसायकलने वडसा वरून नागपुर करिता आपल्या परिवारासह जात होते. त्यादरम्यान मंजुर अहमद याने एम.एच– ४०/ बीएल– १५७५ क्रमांकाचा उभ्या ट्रकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल अनियंत्रीत होवुन गाडी रोडवर पडल्याने फिर्यादीच्या भावाला डोक्याला जबर मार लागला. तसेच फिर्यादीची वहिनी शबिना मंजुर मोटरसायकल वरून खाली रोडवर पडल्याने तिचे मागुन येणारा एम.एच– ४९/ए. टी– ५८७५ चा चालक आरोपीने ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीची वहिनी शबीना मंजुर अहमद शेख उमर, वय ४५ वर्ष रा. रमाई नगर, नारी रोड, नागपुर मंजुर हिच्या कमर आणि पायावरून नेला असता दोघांनाही गंभीर दुखापत झाली. त्यांना ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता मंजुर अहमद व शबाना अहमद मंजुर यांना डॉक्टरांनी चेक करून मृत घोषित केले. ट्रक क्र. एम.एच. ४०/बी.एल १५७५, २) ट्रक क्र. एम.एच. ४९/ए.टी ५८७५ या दोन्ही ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोघांचा मरणास कारणीभुत झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मोहम्मद नाजीम वल्द मोहम्मद अयुब शेख उमर, वय ४७ वर्ष रा. रमाई नगर, नारी रोड, नागपुर पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ), २८३, १८४, १३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो. क्र. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत सावंगी ते सेलु हायवे रोडवर लोहा कंपनी जवळ येथे दिनांक ०६/०५/२०२२ चे १९.३० वा. सुमारास **अनिल हरीचं पटले(मृतक), वय ४१ वर्ष रा. सेलु वार्ड क्र. २** हा आपले मोटर सायकलने जात असता समोरून येणाऱ्या एमएच– ४०/डब्ल्यु– ४१११ क्रमांकाच्या मोटरसायकल चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्यास धडक मारून गंभीर जखमी केले. त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचार घेत असतांना दि ०७/०५/२०२२ चे ०९.३० वा. मरण पावले. मेडीकल पोलीस बुथ नागपूर येथुन कागदपत्र प्राप्त झाल्यावरून वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बुध्दराम शेनलाल कटरे वय ४१ वर्ष रा सेलु यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मेश्राम मो.नं. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

## <u>गळफास लावून मृत्यु</u>

<u>पो.स्टे. कुही</u> :– अंतर्गत २१ कि.मी अंतरावरील बिरसा मुंडानगर कुही फाटा ता. उमरेड जि. नागपुर येथे दिनांक ०८/०५/२०२२ चे ०७:३० वा. दरम्यान **राजा उत्तम गुजर (मृतक) वय २५ वर्ष रा बिरसा मुंडागनर कुही फाटा ता उमरेड, जि. नागपुर** याने अज्ञात कारणातुन त्याचे राहते घरी छताला लोखंडी ऐंगलला नायलॉन दोरीच्या साहयाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बाल्या उत्तम गुजर, वय २५ वर्ष, रा बिरसा मुंडानगर कुही फाटा ता उमरेड, जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार लांजेवार हे करीत आहे.

## <u>पाण्यात बुडुन मृत्यु</u>

<u>पो.स्टे. कुही</u> :– अंतर्गत २२ किमी. अंतरावरील बिरसा मुंडानगर कुही फाटा ता. उमरेड जि. नागपुर येथे दिनांक ०८/०५/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान **गं.भा. रामकलाबाई हिरामन गुजर (मृतक) वय ५० वर्ष रा बिरसा मुंडानगर कुही फाटा ता. उमरेड जि. नागपुर** तिची मुलगी नामे– सुनंदा विशाल महापुरे या दोघीही मिळुन नेहमी प्रमाणे पाणी भरण्याकरीता गावाच्या मागील बंद खदानीत पावसाचे साचलेले पाणी भरण्याकरीता गेल्या असतांना तिचा आईचा पाय घसरून ती खदानीच्या पाण्यात पडलेली आसतांना तिला वाचविण्याकरीता मुलगी सुनंदा विशाल महापुरे ही प्रयत्न करीत असता ती सुध्दा पाण्यात पडली. तेव्हा गावातील लोकांना दिसल्याने त्यांनी त्या दोघींना पाण्याबाहेर काढत असतांना मृतक आई ही पाण्यात बुडुन मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनिल हिरामन गुजर वय २८ वर्ष रा बिरसा मुंडागनर कुही फाटा ता. उमरेड जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार चांगदेव कुथे मो.नं. ९७६४००७७२० हे करीत आहे.

## <u>अकस्मात मृत्यू</u>

<u>पो.स्टे. देवलापार</u> :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा गर्रा ता. रामटेक येथे दिनांक ०५/०५/२२ चे २३.३० ते २४.०० वा. दरम्यान **पंकज कपुरचंद कोवाचे (मृतक), वय २२ वर्ष रा. गर्रा ता. रामटेक** याचे प्रेमप्रकरण हे त्याचे आई वडीलांना माहीत झाल्याने वडील रागवतील या भीतीने त्याने उंदीर मारण्याचे विशारी औशध प्राषन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय देवलापार व नंतर मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे दि. ०६/०५/२०२२ रोजी भरती केले असता उपचार दरम्यान दि ०६/०५/२०२२ चे २२.२० वा. डॉक्टरांनी मृत घोशीत केले. मृतकाचे मरणाचे कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास अशोक उईके मो.क्र. ९३७३६५१४७१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**